## ठाणे महानगरपालिका,ठाणे.

नौपाडा प्रभाग समिती कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे
दिनांक : १६.०३.२०११

## मा.नौपाडा प्रभाग समिती सभा
## सभा सूचना क्र.१०, दिनांक ११.०३.२०११
## सभा क्र.२, दिनांक १६.०३.२०११

ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समितीची सभा बुधवार दि.१६.०३.२०११ रोजी सायंकाळी ठिक ४.०० वाजता नौपाडा प्रभाग समिती कार्यालयातील कै.मो.दा.जोशी सभागृहात सभा सूचना क्र.१०, दिनांक ११.०३.२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यांत आलेली सभा ठाणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक श्री. बी. बी. मोरे यांच्या दुःखद निधनामुळे अर्ध्या तासासाठी तहकुब करण्यात आली होती.

सदरची तहकुब सभा अर्ध्या तासानंतर ठिक ०४.४५ वाजता त्याच ठिकाणी सुरु करण्यात आली. सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा.सुहासिनी सुनिल लोखंडे हया उपस्थित होत्या.

सभेस खालील सन्मानीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | सौ.सुहासिनी (प्रतिभा) सुनिल लोखंडे | अध्यक्षा |
| २ | श्री.संजय संतू वाघुले | सदस्य |
| ३ | श्री.नारायण शंकर पवार | सदस्य |
| ४ | सौ.स्मिता मधुकर देशमुख | सदस्या |
| ५ | सौ.सुजाता भास्कर पाटील | सदस्या |
| ६ | सौ.अनिता हिराकांत फर्डे | सदस्या |
| ७ | श्री.महदिप उर्फ मुन्ना बिष्ट | सदस्य |
| ८ | श्री.मुकुंद रामचंद्र जाधव | स्विकृत सदस्य |
| ९ | श्री.पुंडलिक मारुती थोरवे | स्विकृत सदस्य |

सदर सभेस खालील सन्मा.सदस्य गैरहजर होते.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.अशोक बारकू वैती | सदस्य |
| २ | श्री.विलास शिवराम सामंत | सदस्य |
| ३ | सौ.शांता शामजी सोलंकी | सदस्य |
| ४ | श्री.प्रकाश धोंडू पायरे | स्विकृत सदस्य |

**सौ.सुजाता पाटील :-**

मा.अध्यक्ष महोदया, गेल्या दोन ते तीन सभेमध्ये प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्यांची उत्तरेही मिळत नाहीत किंवा त्यावर काहीही कारवाई केली जात नाही. वृक्षप्राधिकरण विभागास झाडे तोडण्यासंदर्भात जानेवारीमध्ये दोन पत्र व फेब्रुवारीमध्ये एक पत्र असे दोन ते तीन तक्रार अर्ज केलेले आहेत. शाहु मार्केट येथे रस्त्यावरील दिव्यांवर झाडांच्या फांदया येतात त्यामुळे अंधार होतो. त्या फांदया छाटण्याची कारवाई केली जात नाही. संत नामदेव पथ या रस्त्यावरील झाडांच्या फांदया छाटण्याबाबत तसेच शाहु मार्केट प्रभागातील सरस्वती सेकंडरी मराठी हायस्कुल येथील रस्ता रुंदी वाढविण्याकरीता बाधीत होणारे चिचेंचे झाड पाडण्यासाठीही अर्ज केलेला आहे.

**श्री.ढोकळे,वृक्षप्राधिकरण विभाग :-**

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्यांनी दिलेल्या अर्जावर सदर ठिकाणचे फोटो काढून वरीष्ठ अधिका-यांना दाखविलेले आहेत.

**मा.अध्यक्ष :-**

पावसाळया अगोदर लवकरात लवकर झाडांच्या फादयां छाटून टाकाव्यात.

**सौ.सुजाता पाटील :-**

मा.अध्यक्ष महोदया,शाहु मार्केट ऑफिसच्या पाठीमागे दोन्ही बाजूस पार्किग होत आहे याबाबत मला जोशी साहेबांनीही त्यावर ८ दिवसांमध्ये तेथे नो पार्किगचे बोंर्ड लावले जातील असे उत्तर सभेमध्ये दिलेले आहे परंतु अजुनही तसे झालेले नाही. त्यासाठी नगरसेवक तसेच तेथील स्थानिक नागरीकांनीही पत्र दिलेले आहे.

**श्री.नितीन पवार :-**

मा.अध्यक्ष महोदया,या संदर्भात ट्रॅफिक विभागास पत्र व प्रस्ताव दिलेले आहे. त्यांना त्यावर नोटीफिकेशन करावे लागते. ते सात दिवसांमध्ये देतो असे त्यांनी सांगितले आहे परंतु अजून त्यांचे पत्र आलेले नाही ते आल्यानतंर लगेचच बोर्ड लावले जातील.

**सौ.सुजाता पाटील :-**

मा.अध्यक्ष महोदया,गोखले रोडवर सृष्टी प्लाझा सोसायटीला लागून कपाडयाचे दुकान आहे. त्या दुकानदाराने त्याचे सर्व कपडयाचे हँगर त्याच्या गेटला अडकवून स्वतःचे दुकान थाटलेले आहे. त्यावर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई करणे आवश्यक आहे. त्या सोसायटीनेही यासंदर्भात तक्रार केलेली आहे तरीही कारवाई झालेली नाही. त्यांच्यावर आजच्या आज कारवाई करावी.

**श्री.वाघुले, उप कार्यालयीन अधिक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदया, दोन दिवसामध्ये कारवाई करण्यास सांगतो.

**सौ.सुजाता पाटील :-**

मा.अध्यक्ष महोदया,झोपडपट्टी विभागामध्ये जे सार्वजनिक शौचालयाचीं दुरुस्ती करण्यासाठी निधी आहे का ? वडारवाडी,प्रशांतनगर येथील शौचालयांची दुरावस्था आहे, कडया-कोयंडे तुटलेले आहेत.

**श्री.नितीन पवार,कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदया,कोण-कोणत्या शौचालयाबद्दल तक्रार आहे तसे सांगा मग तसा प्रस्ताव करुन पुढे पाठवू.

**सौ.सुजाता पाटील :-**

मा.अध्यक्ष महोदया,चंद्रनगरच्या मागे जे शौचालय आहेत ते नेहमीच चोकअप होत असतात त्यामुळे संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरलेली आहे. ड्रेनेज विभागाने ते चोकअप लवकरातलवकर काढावे .

**श्री.नितीन पवार,कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदया,पहाणी करुन कार्यवाही करतो.

**श्री. मुकंद जाधव :-**

मा.अध्यक्ष महोदया, एम.जी.रोड येथे फुटपाथ वाढविणार आहेत अगोदारच तेथे पार्किगचा त्रास आहे. त्या ठिकाणी नो पार्किंगचे बोर्ड लावा.

**श्री.नितीन पवार,कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदया,०.५ मीटरने फुटपाथ वाढविणार आहोत. त्याठिकाणी नो पार्किंगचे बोर्ड लावण्यांत येतील.

**श्री.संजय वाघुले :-**

मा.अध्यक्ष महोदया, पी वन,
पी टु चे पार्किंग करा.

**श्री.नारायण पवार :-**

मा.अध्यक्ष महोदया, रस्त्यावर जे फुटपाथ आहेत ते नागरीकांना चालण्यासाठी ४० मी. रस्ता रुंद करुनही जेथपर्यत झाडे लावलेली आहेत तेथपर्यत गाडया पार्किंग केलेल्या असतात नागरीकांना चालण्यासाठीही जागा नसते. वंदना टॉकिज तीन पेट्रोल पंप येथे गाडीच्या स्पेअर पार्ट वाले व गॅरेज वाले यांनी फुटपाथ अडून गेलेला आहे त्यातच गाडया उभ्या केल्या जातात. त्यापेक्षा तेथे पे ॲण्ड पार्क चालू करुन गाडया शिस्तीमध्ये उभ्या करणे आवश्यक आहे. तसेच त्याचठिकाणी सी.एन.जी.गॅससाठी रिक्षाची लाईन लागलेली असते. त्यामुळे वाहतूकीची कोंडी होते आणि त्याचा त्रास नागरीकांना होत आहे. सी.एन.जी.गॅस भरण्यासाठी किती रिक्षा एका वेळी उभ्या असायला हव्यात यासाठी फायर ब्रिगेड विभागाकडे नियम असतील. माझे असे मत आहे की यासाठी महाराष्ट्र शासनाने परवानगी दिलेली आहे. पण या गर्दीच्या ठिकाणी सी.एन.जी ठेवण्यापेक्षा जेथे शासनाचा मोकळा भुखंड आहे तेथे सुरु करावा. यासंदर्भात ज्या अटी व शर्ती आहेत ते बघून घ्या नाहीतर आजच्या आज त्या पेट्रोलपंपला नोटीस द्या. तेथे फक्त ४ ते ५ रिक्षाच त्या ठिकाण उभ्या राहू शकता या व्यतीरिक्त जास्त रिक्षा उभ्या राहू शकत नाहीत असे कळवा.

**श्री.डी.डी.शिंदे , अग्निशमन विभाग :-**

मा.अध्यक्ष महोदया,सी.एन.जी.गॅस हा नॅचरल गॅस आहे. परंतु अपुरा साठा असल्याने महाराष्ट्र शासनाने हा प्रकल्प राबविला आहे. शासनाने ठाणे शहरामध्ये तीन ठिकाणी सी.एन.जी.गॅस पुरवठा करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. तरी याबाबत वरीष्ठ अधिका-यांना नोंटीग करतो.

**श्री.नारायण पवार :-**

मा.अध्यक्ष महोदया, सी.एन.जी. गॅसचा आता १५ दिवस झाले तुटवडा आहे. परंतु या अगोदरही हीच परिस्थिती होती.

**श्री.संजय वाघुले :-**

मा.अध्यक्ष महोदया, सी.एन.जी गॅस संदर्भात काय नॉर्मस् आहेत ते बघून घ्या कारण यामुळे संपूर्ण नौपाडा प्रभाग समितीस रिक्षावाल्यानी वेढलेले आहे त्यामुळे नागरीकांना त्रास होत आहे. पेट्रोल पंप वाल्याकडे जाऊन त्यासंदर्भात बोलणी करावी.

शहर विकास विभागास मी दिनांक १३/२/२०१० रोजी पत्र दिलेले आहे. रुक्मिणी पॅलेस येथे स्टील्टमध्ये अनधिकृतपणे बांधकाम झालेले आहे. यासंदर्भात मा.आयुक्त,टी.डी.ओ, विभागत पत्र दिलेले आहे गेले दोन ते तीन महिन्यांपासून सोसायटीनेही तक्रार दिलेली आहे.

**श्री.अमृतकर,शहर विकास विभाग :-**

मा.अध्यक्ष महोदया,सदर प्रकरणाची वस्तुस्थिती काय आहे याची पहाणी करुन कारवाई करतो.

**श्री.संजय वाघुले :-**

मा.अध्यक्ष महोदया,मागील सभेचे मिनिटस् पाहिले तर या प्रकरणावर मला शहर विकास विभागाकडून हेच उत्तर दिलेले आहे. स्टील्टच्या येथे ज्या व्यक्तीने बांधकाम केलेले आहे त्याच्यावर सात दिवसांमध्ये कारवाई व्हायला पाहिजे.

**श्री.अमृतकर,शहर विकास विभाग :-**

मा.अध्यक्ष महोदया,सात दिवसाच्या आत कारवाई करतो.

**श्री.संजय वाघुले :-**

मा.अध्यक्ष महोदया,नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत जे विकास प्रस्ताव मंजूर करण्यांत आलेले आहेत त्याचे बोर्ड लावलेले नाहीत.

**श्री.अमृतकर,शहर विकास विभाग :-**

मा.अध्यक्ष महोदया, जे मंजूर विकास प्रस्तावाचे बोर्ड लावलेले नाही त्याच्या साईटवर जाऊन कारवाई करण्यात येईल.

**मा.अध्यक्ष :-**

पुढील सभेमध्ये पुन्हा हा प्रश्न चर्चेला येणार नाही अशा पध्दतीने कारवाई करा.

**श्री.संजय वाघुले :-**

मा.अध्यक्ष महोदया, काही विकासकांनी महापालिकेच्या गटारांवर रॅबीट टाकलेले आहे.

**श्री.नारायण पवार :-**

मा.अध्यक्ष महोदया, मी मागील सभेमध्ये प्रश्न उपस्थित केला होता की जे विकास प्रस्ताव मंजूर झालेले आहेत त्यांचे बांधकाम चालू आहे त्यांनी त्याठिकाणी बोर्ड लावले पाहिजे त्यावर त्यांचे व्ही.पी.नंबर त्या बोर्डवर लिहीला पाहिजे.

**श्री.अमृतकर,कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्य पवार यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या अनुषंगाने जे जे प्रस्ताव मंजूर झालेले आहेत तेथे प्रत्यक्ष साईटवर जाऊन पहाणी करतो व जेथे बोर्ड लावलेले नाहीत त्यांच्यावर कारवाई करतो.

**श्री.नारायण पवार :-**

मा.अध्यक्ष महोदया, शहर विकास विभागाकडून ज्या ज्या विकासकांचे प्रस्ताव मंजूर केले जातात त्यांच्याकडून जर महापालिकेचे नुकसान होत असेल तर त्याची भरपाई त्या विकासकाकडून घेण्यांत यावी अशी अट सी.सी. देताना महापालिकेने टाकावी .

**सौ.सुजाता पाटील :-**

मा.अध्यक्ष महोदया, माझ्या प्रभागामध्ये चिखलवाडी येथे विकासकाचे काम चालू आहे तेथे रॅबीट पडल्यामुळे गटार चोकअप होऊन लोकांच्या घरांमध्ये पाणी शिरते

**श्री.संजय वाघुले :-**

मा.अध्यक्ष महोदया, माझ्या प्रभागामध्ये तीन ते चार विकासकांचे काम चालू आहेत त्यांचे मटेरीयल सर्व रस्त्यावर असते ते गटारामध्ये जाऊन गटार चोकअप होतात.

**श्री.नितीन पवार,कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदया, ज्या विकासकांचे काम चालू आहेत त्यासंदर्भात मी शहर विकास विभागास कळविलेले आहे त्यानी त्याबाबत सुचना केलेल्या आहेत त्या सुचना विकास प्रस्तावामध्ये करणेबाबत वरीष्ठांना कळवू. रस्त्यावर जे मटेरीयल पडलेले आहे ते जप्त करण्याची कारवाई करु.

**श्री.नारायण पवार :-**

मा.अध्यक्ष महोदया, शहरामध्ये अनेक ठिकाणी अशी कामे चालू आहे त्याबाबतीत मा.आयुक्तांना पत्र दिलेले आहे त्यावर संबधित विभागाकडून कारवाई होत नाही. माझ्या प्रभागामध्ये सरस्वती शाळेसमोर खोदून ठेवलेले आहे त्याची दुरुस्ती कधी होणार आहे ? जे काम चालू आहे ते काम कोणत्या शासकीय यंत्रणेकडून करण्यांत येत आहे याची माहितीचा नामफलक कामाच्या ठिकाणी नसतो. जनतेचा पैसा आहे त्याचा विनियोग व्यवस्थीत होणे आवश्यक आहे. महानगरपालिकेसमोरील रस्ता होत नाही . कामांमुळे वाहतुक कोंडी होत आहे. कनिष्ठ अभियंता यांनी याची पहाणी करणे आवश्यक आहे. वीर सावरकर रस्त्याचे काम अर्धवट ठेवलेले आहे ते पुर्ण करुन घ्यावे तसेच कामांच्या ठिकाणी बोर्ड लावलेले नाहीत ते लावण्यात यावेत.

**श्री.नितीन पवार,कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्यांनी सुचनाचा विचार करुन आवश्यक पुढील कार्यवाही करतो.

**श्री.नारायण पवार :-**

मा.अध्यक्ष महोदया, कचराळी तलाव येथे चोरी संबधी पोलिस स्टेशनला तक्रार केली होती त्याचे पुढे काय झाले ? त्यांना पुन्हा रिमायंडर दया. आर्किटेक्कडून सर्वे न करता शौचालय तोडले . महापालिकेच्या मालमत्तेची चोरी झाली तरी काहीही कारवाई होणार नसेल तर मला यासाठी शासनाकडे दाद मागावी लागेल.

**श्री.नितीन पवार,कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदया, नविन शौचालय बांधून झाल्यानतंर जुन्या शौचालयाचे सर्व्हे करु. पोलिस स्टेशनला वस्तुस्थिती काय आहे हे सांगण्यात आलेले आहे. तरी पुन्हा एकदा रिमांयडर करतो.

**श्री. मुकुंद जाधव :-**

मा.अध्यक्ष महोदया, डांबरीकरणाचे काम होणार आहे की नाही ?

**श्री.नितीन पवार,कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदया, डांबरीकरणाचे काम दोन ते तीन दिवसामध्ये चालू करु.

**सौ. स्मिता देशमुख :-**

मा.अध्यक्ष महोदया, वर्षातुन दोन वेळा नाले सफाई करणार आहोत . नाले सफाईचे काम कधी चालू करणार ? कारण जर मार्च-एप्रिल पासून नाले सफाईस सुरुवात केली तर पावसाळया आगोदर होऊ शकेल. ठाणे महानगरपालिकेचा १७५० कोटी रुपयाचा अर्थसंकल्प असून नाले सफाई व्यवस्थीत होत नाही. त्यामुळे पावसाळयात गटारांचे पाणी लोकांच्या घरामध्ये शिरते. त्यामुळे पावसाळया अगोदर नालेसफाई होणे गरजेचे आहे.

**श्री.नारायण पवार :-**

मा.अध्यक्ष महोदया, गटार साफसफाईचे काम सफाई कामगार करतो पण गटारांवर स्लॅब टाकलेले असल्यामुळे गटार पुर्णपणे साफ केले जात नाही कारण सफाई कामगारास स्लॅबमुळे गटार साफ करणे शक्य होत नाही. गटारांवर जे चेबर्स लावलेले आहेत त्यामधील अंतर १०-१० फुटाचे असावे जेणेकरुन आरोग्य विभागास गटार साफसफाई करणे शक्य होईल. केबलच्या व पाण्याच्या पाईपलाईनस् गटारामध्ये असतात त्यामुळे साफ करणे शक्य होत नाही. या गटारांतील घाणीमुळे डासांचे साम्राज्य वाढत चाललेले आहे. शौचालय साफ करण्यासाठी ॲसिड मिळत नाही,शौचालयांना कडया-कोयंडया नसतात. तसेच आराधना टॉकिजसमोर कोंबडयाचे दुकान आहे त्या विक्रत्याने पुर्ण फुटपाथ वापरत आहे त्यांच्यावर कारवाई करावी.

**श्री.संजय वाघुले :-**

मा.अध्यक्ष महोदया, अनधिकृत अधिकृत हॉटेल,इमारतींवर अनधिकृतरित्या होर्ल्डींग्ज लावलेले असतात.

**श्री.सारंग, जाहिरात विभाग :-**

मा.अध्यक्ष महोदया, पहाणी करुन कारवाई करतो.

**श्री. वाघुले, उप कार्यालयीन अधिक्षक :-**

प्रकरण क्र. ११९,१२०,१२१ वाचुन दाखवितात.

प्रकरण क्र. ११९,१२०,१२१ मंजूर करण्यात येतात.

**********

प्रकरण क्र. ११९ ठाणे महानगरपालिकेच्या मा. नौपाडा प्रभाग समितीच्या दि. २३.०२.२०११ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तांत कायम करणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र. १२५, दि. १६.०३.२०११**

<u>**ठराव**</u> :-

ठाणे महानगरपालिकेच्या मा. नौपाडा प्रभाग समितीच्या दि. २३.०२.२०११ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तांत ही समिती वाचून कायम करीत आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील    अनुमोदक :- सौ. स्मिता देशमुख

सर्वानुमते मंजूर

**सही/- (सौ. सुहासिनी लोखंडे)**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

प्रकरण क्र. १२० नौपाडा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र. ६८ मध्ये नगर सेवक निधी अंतर्गत धर्मवीर मार्गावरील जवळील परिसरात एफ.आर. पी. बेंचेस बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र. १२६, दि. १६.०३.२०११**

<u>**ठराव**</u> :-

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६८ मधील सन्मा.सदस्य सौ. स्मिता देशमुख यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.१,७३,८००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक,ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं.मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,७३,८००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष त्र्याहत्तर हजार आठशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील अनुमोदक :- श्री.संजय वाघुले

सर्वानुमते मंजूर

**सही/- (सौ. सुहासिनी लोखंडे),**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

प्रकरण क्र. १२१ नौपाडा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र. ६८ मध्ये नगर सेवक निधी अंतर्गत गुरुकूल सोसायटी जन. अरुणकुमार वैद्य मार्ग व संत ज्ञानेश्वर पथ जवळील परिसरात एफ.आर. पी. बेंचेस बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र. १२७, दि. १६.०३.२०११**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६८ मधील सन्मा.सदस्य सौ. स्मिता देशमुख यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.१,८९,६००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक,ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं.मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,८९,६००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष एकोणनव्वद हजार सहाशे मात्र) चे खर्चास मुंबई

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील अनुमोदक :- श्री.संजय वाघुले

सर्वानुमते मंजूर

**सही/-(सौ. सुहासिनी लोखंडे),**
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

( अशा त-हेने साधक बाधक चर्चा झाल्यानंतर मा. अध्यक्ष महोदया, संध्याकाळी ठिक ०५.३५ वाजता सभा संपल्याचे जाहिर करतात.)

सही/- **श्री. ज्ञानदेव वाघुले)**
उप कार्यालयीन अधिक्षक
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सचिव विभाग
नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.
सभा समाप्तः संध्याकाळी ठिक ०५.३५ वाजता.
दिनांकः १६/०३/२०११.